स्थानिक गुन्हे शाखा जळगाव
दिनांक १८/०५/२०२५

-: प्रेस नोट :-

प्रति,

मा.संपादक ,

----------------

**तेलंगणा राज्यातील खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी जेरबंद .**

--- ००० ---

तेलंगणा राज्यातील सायबराबाद पोलीस आयुक्तालयातील चंदानगर पोलीस स्टेशन हद्दीत सुमारे तिन महिन्यापुर्वी गुरन.१७२/२०२५ भा.न्या.सं. १०३(१) प्रमाणे दाखल खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी नामे अझहर निजाम खाटीक रा. जळगाव हा गुन्हा घडलेपासुन फरार असुन सदर आरोपीच्या शोधकामी चंदानगर पोलीस स्टेशन, पोलीस आयुक्तालय सायबराबाद जि. तेलंगणा कडील पोलीस पथक जळगाव जिल्ह्यात दाखल झाले. सदर पथकाने मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगाव यांची भेट घेवुन हकिकत कथन करुन आरोपीचा शोध घेणेकरीता स्थानिक पोलीस पथकाची मदत मिळणेबाबत विनंती केली. मा.पोलीस अधीक्षक यांनी घटनेचे गांर्भीर्य ओळखुन तात्काळ श्री.बबन आव्हाड, पोलीस निरीक्षक, स्थागुशा जळगाव यांना आदेशीत करुन सदर पथकास योग्य ती कायदेशीर मदत करणे बाबत आदेशीत केले.

श्री. बबन आव्हाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थागुशा जळगाव यांनी तात्काळ सदर पथका कडून आवश्यक माहिती घेवुन स्थागुशा जळगाव कडील सफौ विजयसिंग पाटील व पोह अक्रम शेख, यांचे पथक स्थापन करुन योग्य त्या सुचना व मार्गदर्शन करुन चंदानगर पोलीस स्टेशन कडील पथकासह सदर आरोपीचा तात्काळ शोध घेवुन ताब्यात घेण्यास सांगितले.

वर नमुद पथकाने तात्काळ गोपनीय माहिती काढून आरोपी नामे अझहर निजाम खाटीक रा. जळगाव बाबत माहिती प्राप्त केली असता सदर आरोपी हा मेहरुण जळगाव परिसरात लपला असलेची गोपनिय माहिती मिळाल्याने वर नमुद पथकाने दि.१६/०५/२०२५ रोजी सापळा रचुन रात्री सुमारे ११.३० वाजता अझहर निजाम खाटीक रा. जळगाव यास पाटलाग करुन शिताफीने ताब्यात घेवुन पुढील कायदेशीर कारवाई करीता चंदानगर पोलीस स्टेशन, पोलीस आयुक्तालय सायबराबाद जि. तेलंगणा यांच्या ताब्या देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा.श्री.बबन आव्हाड, पोलीस निरीक्षक, स्थागुशा जळगाव यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशा जळगाव कडील सफौ विजयसिंग पाटील व पोह अक्रम शेख, यांनी केली आहे.

**( बबन आव्हाड )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव.